सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- एनएएक्स- ०३१८/ प्र. क्र. १३३/विशा १ब, दि.१३/०२/२०२६

**विषय:-** मे पवनहंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांच्याकडून भाडे तत्वावर घेतलेल्या हेलीकॉप्टरची मुदतवाढ तसेच, भाडे दरात १०% वाढ करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- एनएएक्स- ०३१८/ प्र. क्र.१३३/विशा १ब, दि.१३/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१३१५५७०६७६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (विशेष कृती) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली
पोलीस अधीक्षक, गडचिरोली
कार्यासन अधिकारी, का क्र.२१ अ

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**मे. पवनहंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांच्याकडून भाडे तत्वावर घेतलेल्या हेलीकॉप्टरची मुदतवाढ तसेच, भाडे दरात १०% वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र.- एनएएक्स ०३१८/प्र.क्र.१३३/विशा-१ब**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - १३ फेब्रुवारी, २०२६.

वाचा-

१. शासन निर्णय क्र. - एनएएक्स- ०३१८/प्र.क्र.१३३/विशा-१ब, दि. २८/०१/२०२५.
२. पोलीस अधीक्षक (विशेष कृती), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. DGP-२१A०१२/२/२०२३-DESk-२१A, दि. ०१/१२/२०२५.

**प्रस्तावना :-**

मे. पवनहंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामध्ये नक्षलग्रस्त भागात पोलीस दलाचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच, जखमी व्यक्ती आणि जवानांची ने-आण करणे, जखमी जवानांना त्वरीत वैद्यकीय सहाय्य तसेच खाद्यसामुग्री पुरविणे, संशयित भागाची पाहणी करणे इ. कामांकरिता हेलीकॉप्टर भाडे तत्वावर घेण्याकरीता दि. ०१/१२/२०२४ ते दि. ३०/११/२०२५ पर्यंत मुदतवाढ यापूर्वी देण्यात आली होती. सदरची मुदतवाढ दि. ३०/११/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. त्या अनुषंगाने, मे. पवनहंस हेलिकॉप्टर लिमीटेड, मुंबई या कंपनीकडून हेलिकॉप्टर पुढील ०१ वर्षाकरिता (दि. ०१/१२/२०२५ ते ३०/११/२०२६ पर्यंत) मुदतवाढ मिळणेबाबत तसेच, भाडे दरात १०% वाढ करणेबाबत पोलीस अधीक्षक (विशेष कृती) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधीन क्र. २ च्या पत्रान्वये विनंती केली होती. त्यानुसार सदर मुदतवाढ व भाडे दरात १०% वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नक्षलग्रस्त अतिसंवेदनशील भागात पोलीस दलाचे बळकटीकरण, जखमी व्यक्ती तसेच, जवानांची ने-आण करणे, जखमी जवानांना तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना त्वरीत वैद्यकीय सहाय्य पुरविणे, जवानांना खाद्यसामुग्री पुरविणे, संशयित भागाची पाहणी करणे इ. कामांकरिता मे. पवनहंस हेलिकॉप्टर लिमीटेड, मुंबई या कंपनीकडून हेलिकॉप्टर पुढील पुढील ०१ वर्षाकरिता (दि. ०१/१२/२०२५ ते ३०/११/२०२६ पर्यंत) मुदतवाढ तसेच, भाडे दरात १०% वाढ करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठीचा खर्च मागणी क्र. "बी-१, २०५५ पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५ ०१६८) ५१ मोटार वाहने" या लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातून करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २८/०३/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठित उच्चस्तरीय सचिव समितीने दि. २७/०१/२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२१३१५५७०६७६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ARVIND TULSHIRAM SHETE
Date: 2026.02.13 15:58:23 +05'30'

**(अरविंद शेटे)**
**उप सचिव, गृह विभाग.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधीपक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
८. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१४. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६. आयुक्त, राज्य गुप्तावार्ता विभाग, मुंबई.
१७. अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे.
२०. विशेष पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपुर.
२१. जिल्हाधिकारी, गडचिरोली / गोंदिया.
२२. पोलीस अधिक्षक, गडचिरोली / गोंदिया.
२३. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
२४. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली/ गोंदिया.
२५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२६. निवडनस्ती (विशा-१ब).